
वागळे वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क. पोउपआ/वावि/वाहतूक नियंत्रण अधिसूचना/ ७८७ /२०२६ दि. ०५/०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, वागळे इस्टेट वाहतुक उपविभाग ठाणेमहानगर पालीका कार्यक्षेत्रात दिनांक ०६/०९/२०२६ रोजी पहाटे ०५:०० ते ०८:०० वाजे पर्यत ''IKA SPORTS & EVENTS '' यांचेमार्फत मॅरेथॉन रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे स्पर्धकांना इजा होवू नये या करीता उपवन कडुन रेमंड कंपनीकडे येणारी सर्व वाहतुक पुर्णपणे बंद करून त्यांना पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. त्यामुळे स्पर्धेच्या कालावधीत सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद –	**१)** गावंड बाग–येऊर गेट–देवदयानगर परीसर–बिरसामुंडा चौकातुन– शास्त्रीनगर–वर्तकनगर कडुन–कॅडबरी जंक्शनकडे येणा–या रोडवरील सर्व प्रकारच्या वाहनांना **येऊर गेट, देवदयानगर चौक, बिरसामुंडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही कॅडबरी जंक्शनकडुन – वर्तकनगर – येऊर गेट कडे जाणाऱ्या वाहीनीवरील तीन लेन पैकी एका लेनवरून इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** देवदयानगर परीसरातील – शिवाईनगर – बिरसामुंडाचौक कडुन देवदयानगर मार्गे शास्त्रीनगरकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **देवदयानगर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	**अ)** देवदयानगर – शिवाई नगर – परीसरातील वाहने ही – बिरसामुंडा चौक – बेथनी हॉस्पीटल मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.
पर्यायी मार्ग –	**ब)** येऊर गेट कडुन येणारी सर्व वाहतुक ही उपवन तलाव – पायलादेवी मंदिर – बिरसामुंडा चौक – बेथनी हॉस्पीटल मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि.०६/०९/२०२६ रोजी सकाळी ०४:३० वा. ते ०८:४५ वाजेपर्यत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.